# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १७/०१/२०२३ (मंगळवार) सकाळ**

## रेती चोरी करणाऱ्या आरोपींतांविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. खापा :—** अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावर नंदापूर शिवार कन्हान नदीचे पात्र येथे दिनांक १०/०१/२०२३ ते १५/०१/२०२३ चे ११.०० वा. पर्यंत यातील संशयीत ३ आरोपी नामे— १) जगदिश झाडे, रा. करसघाट २) रोशन महंत रा. खानगाव ३) महेश चकोले रा. सावनेर यांनी नंदापूर शिवार कन्हान नदीचे पात्रातुन अवैधरित्या एकुण ४२० ब्रास रेती किंमती अंदाजे असा एकुण ११,०२,४००/— रु. घाटातुन उत्खनन करुन चोरी करुन घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कल्लु हसन कनोजे वय ५६ वर्ष मंडळ अधिकारी खापा यांचे रीपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीतांचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कलेगुरवार पोस्टे खापा मो. न. ९१७५५७९१४३ करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मौजा पालीवाल पेट्रोलपंप करंभाड येथे दिनांक १६/०१/२०२३ चे ०५.१५ वा. ते ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राजेश सेवकराम गोमकाळे, वय ३८ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१ तामसवाडी ता. पारशिवनी याने आपले दोन्ही ट्रक क्र. एम. एच.—४० बी.जी.—३०१५ व ट्रक क्र. एम. एच.—४०/बी.जी.—५१५५ हे पालीवाल पेट्रोलपंप येथे उभे केले असता यातील घटना वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात कार चालकाने ट्रक क्र. एम. एच.—४०/बी.जी.—३०१५ चे डिजलटंकी मधुन अंदाजे १३० लिटर डिजल प्रत्येकी ९२.९८/—रू. प्रमाणे एकुण डिजल किंमती अंदाजे असा एकुण १२,०८७/—रूपयाचे डिजल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. १४९० रवि बर्वे मो.क्र. ९८८१७४४५२९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत न्यु आदर्श कॉलनी शितलवाडी, रामटेक येथे दिनांक १५/०१/२०२३ चे १७:०० वा. पासून ते दिनांक १६/०१/२०२३ चे ०८:०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— पकंज सहादेव राठोड, वय ३४ वर्ष, रा. ग्रामपंचायत देवलापार जवळ ह. मु. न्यु आदर्श कॉलोनी शितलवाडी, रामटेक याने त्यांचे घर बांधणेकरीता आणुन ठेवलेले ८ एमएमचे लोखंडी ५० कॉलमचे रिंग व कॉलम रिंग तयार करण्याकरीता कापून ठेवलेले ३९ इंचचे ६० लोखंडी तुकडे आणि ५ लोखंडी तरापे दोन्ही मिळून एकुण वजन अंदाजे ६८ किलो प्रति ६६/— रू. प्रमाणे ४४८८/— रू. व ठेकेदार संतोष कुंभलकर यांचे सेन्ट्रींगचे ५ लोखंडी तरापे एकुण ८५ किलो वजनाचे प्रति ८५ रू. किलो प्रमाणे एकुण ६३७५/— रू. असा एकुण १०८६३/— रूपयाचा मुद्देमाल घराचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणावरून खुल्या बाथरूम मधून कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक योगेश भुरे, ब. नं. ६७३ मो. नं. ८३२९५३७३६१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**